# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह राबविण्यात येत आहे.

स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा रासेयो कक्ष आणि सहायक कार्यक्रम सल्लागार रासेयो संचालनालय नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. ७ जून ते १३ जून या कालावधीत पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह पाळला जात आहे. शुक्रवारी रासेयोच्या स्वंयसेवकांनी संगणकशास्त्र प्रशाळा, शिक्षणशास्त्र विभाग, आजीवन अध्ययन विस्तार सेवा विभाग, सामाजिकशास्त्र प्रशाळा, गणित प्रशाळा या परिसरातील प्लास्टीक व कचरा वेचला. रासेयोच्या वतीने पथनाटय तसेच प्रत्येक गावात ग्रीन क्लब निर्माण केले जाणार आहे. सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता देखील केली जाणार आहे, अशी माहिती रासेयोचे संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी दिली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:- १० जून,२०२२

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात, जळगाव,धुळे व नंदुरबार आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी